भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०३/२०१७

**१) एस.टी. चालकांच्या निष्काळजीपणामुळे, मृत्यु झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/०३/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील आरोपी आपले ताब्यातील एस.टी भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मोतीराम फत्तु कुंभरे वय ६८ वर्ष रा. नवेझारी त. तिरोडा जिल्हा गोंदिया यास धडक मारून जखमी केले व पी.एस.सी. करडी येथे उपचार दरम्यान मरण पावला यातील आरोपी हा जखमीचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी राजु मोतीराम कुंभरे वय ४० वर्ष, रा. नवेझरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३०४ (अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. बोरकुटे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या निष्काळजीपणामुळे धडक देवुन चौघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०२/२०१७ चे १२.०० ते १२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी जखमी हा आपली मोटार सायकल क्र. एमएच. ४० एस. ७०१२ ने पत्नी सौ. रेनुका नंदुरकर वय ३० वर्ष, व मुलगा अमोल नंदुरकर वय ०६ वर्ष व मोठा मुलगा साहील वय ०९ वर्ष असे मिळुन केशोरी पो.स्टे. मौदा येथे जात असतांना दवळीपार बाजार गावाचे दरग्याजवळ आपले बाजुने जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल डब्बलसीट भरधाव वेगाने लापरवाहीने चालवुन भंडाराकडुन अडयाळ कडे जात असतांना फिर्यादीचे मोटार सायकलला समोरून धडक मारल्याने जखमी फिर्यादी पत्नी व दोन्ही मुलांना व स्वता: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी प्रभाकर ताराचंद नंदुरकर वय ३५ वर्ष रा. वैजेश्वर वार्ड यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४, मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) अवैध प्रवासी गाडीमध्ये बसवुन, चालक परवाना न बाळगतांनी मिळुन गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०३/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मॅक्स गाडी ही हयगयीने चालवीतांना तसेच वाहनाचे मागील बाजुस प्रवासी उभे करून त्याचे जिवीतास धोका निर्मान करून अशा रितीने वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने व सोबत चालक परवाना न बाळगतांना मिळुन आल्याने सरतर्फे पोना. रामटेके पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९, भादंवि. सहकलम ३/१८१, मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) आपले ताब्यातील वाहन आमरोडवर, वाहतुकीस अळथडा निर्मान होईल अशा स्थितीत उभे केलयाने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०१/०३/२०१७ चे १७.१५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन आमरोड वर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्मान होईल अशा स्थितीत उभी करतांना मिळुन आल्याने सरतर्फे पोहवा. कोळवते पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोळवते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०१/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.